बन्सीलाल रामनाथ अगरवाल चॅरिटेबल ट्रस्ट संचलित
विश्वकर्मा इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी
(सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्न स्वायत्त संस्था)
(पुर्वीचे पुणे विद्यापीठ)
६६६, अप्पर इंदिरानगर, बिबवेवाडी, पुणे - ४११ ०३७.
Approved by A. I. C. T. E. New Delhi

Bansilal Ramnath Agarwal Charitable Trust's
Vishwakarma Institute of Technology
An Autonomous Institute Affiliated to Savitribai Phule Pune University
(Formerly University of Pune)
666, Upper Indiranagar, Bibwewadi, Pune - 411 037.
Identification No. - PU/PN/Engg./061/(1984)

नोटीस क्र. 283 — नोटीस — दि.०८/१०/२०२५

**शैक्षणिक वर्ष २०२५-२६ करिता "पंडित दिनदयाल उपाध्याय स्वयंम योजना" करिता ऑफलाईनअर्ज सादर करणेबाबत.**
**(फक्त भटक्या जमाती-क (धनगर) प्रवर्गकरिता लागू आहे.)**

महाविदयालयातील NT-C (Dhangar) या प्रवर्गातून ज्या विद्यार्थ्यांनी प्रथम/थेट व्दितीय/तृतीय/अंतिम वर्ष बी.टेक करिता प्रवेश घेतलेला आहे अथवा जे विद्यार्थी प्रवेश घेणार आहे आणि खालील अटी व शर्तीची पूर्तता करू शकतात, अशा विद्यार्थ्यांनी " **पंडित दिनदयाल उपाध्याय स्वयंम योजना**" या योजनेकरिता ऑफ लाईन भरलेले अर्ज योग्य त्या कागदपत्रांसह खालील नमूद तारखेपर्यंत शासना संबंधित विभागाकडे जमा करावेत. ऑफलाईन अर्जाचा नमुना विद्यार्थ्यांनी महाविद्यालयातून प्राप्त करून घ्यावा.

| १. | विद्यार्थ्यांने अर्ज जमा करण्याचे ठिकाण | अर्ज जमा करण्याची अंतीम तारीख |
|---|---|---|
| | संचालक, इतर मागास बहुजन कल्याण विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे कार्यालय पत्ता, विश्रांतवाडी पोलीस चौकीजवळ, विश्रांतवाडी, येरवडा, पुणे, | दि. २६/१०/२०२५ |

**-योजनेसाठी अटी व शर्ती व कागदपत्रे खालील प्रमाणे-**

१) विद्यार्थ्याचा जातीचा दाखला हा NT-C (Dhangar) या प्रवर्गातील असावा.
२) विद्यार्थी महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असावा.
३) विद्यार्थ्याच्या दोन्ही पालकांचे मिळून वार्षिक उत्पन्न दाखला रूपये २.५० लाखापेक्षा जास्त नसावे.
४) अर्जदार विद्यार्थ्यांनी शासनाच्या वसतिगृह प्रवेशासाठी अर्ज केलेला असणे/सादर करणे बंधनकारक आहे. अर्ज सादर केला आणि वसतिगृह अलॉट झाले नसल्यास सदर योजनाचा लाभ प्रायव्हेट हॉस्टेल/कॉट बेसिस अथवा भाडेकरारनामा करून राहत असणाऱ्या विद्यार्थ्यांना त्याची निवड झाल्यास देय राहील याची विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी व तसे कागदपत्रे सादर करणे प्रत्येक विद्यार्थ्याला बंधनकारक राहील.
५) भाडे करारनामा प्रत, भाडे चिठ्ठी व व विद्यार्थी स्थानिक रहिवासी नसल्याबाबतचे प्रमाणपत्र सादर करावे.
६) विद्यार्थी शासकीय वसतिगृहात राहत नसल्याचे शपथपत्र सादर करणे बंधनकारक राहील.
७) विद्यार्थ्यांने दिलेली माहिती खरी व अचुक असल्याबाबतचे स्वयंघोषणापत्र सादरकरणे बंधनकारक आहे.
८) महाविद्यालयात प्रवेश घेतल्याचा पुरावा सादर (फी पावती/बोनाफाईड सर्टीफिकेट) करणे बंधनकारक राहील.
९) विद्यार्थी अनाथ असल्यास त्यास महिला व बालकल्याण विभागाकडील सक्षम प्राधिकाऱ्याने जारी केलेले अनाथ प्रमाणपत्र जोडणे अनिवार्य आहे.
१०) विद्यार्थी दिव्यांग असल्यास त्यास जिल्हा शल्य चिकित्सक यांनी जारी केलेले ४०% पेक्षा जास्त दिव्यांग असल्याबाबतचे प्रमाणपत्र जोडणे अनिवार्य आहे.
११) विद्यार्थ्याचे स्वत:चा आधार क्रमांक त्याने त्याचे बँक अकौटं क्रमांकाशी संलग्न करणे बंधनकारक आहे.
१२) शासकीय वसतिगृहातमध्ये प्रवेशित विद्यार्थ्यांना योजना लागू राहणार नाही. त्यांनी अर्ज करू नयेत.
१३) निवड झालेल्या विद्यार्थ्यांने अभ्यासक्रम पूर्ण न करताच सोडला अथवा शिक्षण घेत असताना नोकरी /व्यवसाय करीत असल्याचे निदर्शनास आल्यास सदर विद्यार्थी कारवाई पात्र राहील व त्यांस मंजूरी झालेली संपूर्ण रक्कम व्याजासह वसूल करण्यात येईल.
१४) विद्यार्थ्याची वर्गातील (क्लासमधील) उपस्थिती ७५% असणे अनिवार्य आहे.
१५) या नोटीससोबत अर्जाचा नमुना दिलेला आहे तो विद्यार्थ्यांना डाऊनलोड करून घ्यावा.
१६)

B.R.A.C. TRUST ★ विश्वकर्मा इन्स्टिट्युट पुणे-३७. Vishwakarma Institute of Technology

संचालक
विश्वकर्मा इन्स्टिट्युट ऑफ टेक्नॉलॉजी, पुणे-३७

प्रत:- १) सर्व विभाग प्रमुख यांना माहितीसाठी व विभागातील नोटीस बोर्डसाठी, २) महाविद्यालयातील सर्व नोटीस बोर्डकरिता- विद्यार्थ्यांच्या माहितीस्तव ३) सिस्टीम विभाग प्रमुख यांना महाविद्यालयाच्या संकेतस्थळावर अपलोड करणेकरिता.